* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

## प्रेसनोट

### १७ व्या अमरावती परिक्षेत्रिय कर्तव्य मेळाव्याला आजपासुन प्रारंभ

१७ वा अमरावती परिक्षेत्रिय पोलीस कर्तव्य मेळावा आज दिनांक १९/०८/२०१९ पासुन वाशिम येथे होणार आहे. तिन दिवस सुरू राहणाऱ्या पोलीस कर्तव्य मेळाव्याचे उद्‌घाटन सकाळी ९:३० वा. जुने पोलीस मुख्यालय वाशिम. येथे मा. श्री ऋषिकेश मोडक जिल्हाधिकारी वाशिम यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास मा. श्री वसंत परदेशी भा.पो.से पोलीस अधीक्षक वाशिम. व श्री विजयकुमार चव्हाण अपर पोलीस अधीक्षक वाशिम. यांची प्रमुख उपस्थीती लाभणार आहे.

पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कौशल्याची चाचणी घेण्यासाठी व व्यावसायीक गुणवत्ता सुधारण्यासाठी पोलीस कर्तव्य मेळावा आयोजित केला जातो..

अमरावती परिक्षेत्रिय कर्तव्य मेळाव्यामध्ये एकुण ६ प्रकारचा स्पर्धा घेतल्या जाणार असुन त्यामध्ये घातपात विरोधी तपासणी स्पर्धा, श्वान स्पर्धा, कॉम्पुटर स्पर्धा, पोलीस फोटोग्राफी, पोलीस व्हिडीओ ग्राफी, विज्ञानाची तपासात मदत, अश्या सहा प्रकारामध्ये एकुण २१ परीक्षा घेतल्या जाणार आहे. वरील स्पर्धामध्ये अमरावती परिक्षेत्रातील अमरावती, अकोला,बुलढाणा, यवतमाळ, व वाशिम जिल्हा पोलीस दलातील एकुण ११२ स्पर्धक ज्यामध्ये ३२ अधिकारी व ८० कर्मचारी सहभागी होणार असुन सदर स्पर्धेमध्ये पदक विजेत्या स्पर्धकास पुढे होणाऱ्या राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्या सहभागी होता येणार आहे. सदर स्पर्धा हया वाशिम पोलीस मुख्यालय येथे पार पडणार आहेत. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना वाशिम जिल्हा पोलीस दला तर्फे जिल्हा पोलीस अधिक्षक मा.श्री वसंत परदेशी भा.पो.से यांचे कडुन शुभेच्छा देण्यात आल्या आहे.

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम